माहिती हवीय?

रविकांत रोहिदास साखरे, कुंभारतळे

□ **'कोई चुपके से आ के सपने सुला के...', 'आ इंतजार है तेरा दिल बेकरार है मेरा...', 'मेहफील में जल उठी शमा परवाने के लिये...', 'प्रेम का है इस जंग मे पथ निराला...' ही गाणी कोणत्या चित्रपटातील? आहेत. कोणत्या कलाकारांवर चित्रित केली आहेत? संगीत दिग्दर्शक कोण?**

– 'कोई चुपके से आ के सपने सुला के...' हे गाणं *अनुभव* या चित्रपटातील तनूजावर चित्रित झालं होतं. संगीतकार होते कानू रॉय. 'आ इंतजार है तेरा दिल बेकरार है मेरा...' हे गाणं *बडी माँत* नूरजहाँने गायलं होतं आणि तिच्यावरच चित्रित करण्यात आलं होतं. संगीतकार होते के. दत्ता. 'मेहफील में जल उठी शमा परवाने के लिये...' हे गाणं *निरालात* मधुबालावर चित्रित करण्यात आलं होतं. संगीतकार होते सी. रामचंद्र. 'प्रेम का है इस जंग मे पथ निराला...' हे गाणं *प्रेसिडेंटमध्ये* सायगलवर चित्रित करण्यात आलं होतं. संगीतकार होते आर. सी. बोराल.

सुधीर नारायण चोरघडे, पनवेल.

□ **बेबी नंदाची कौटुंबिक पार्श्वभूमी काय आहे? तिचा पहिला चित्रपट कोणता? नायक कोण? ती महाराष्ट्रीय आहे का? तिने मराठी चित्रपटांत अभिनय केलाय का?**

– बेबी नंदाची पार्श्वभूमी फिल्मी आहे. तिचे वडील मा. विनायक मराठीतील एक नामांकित निर्माता-दिग्दर्शक व अभिनेते होते तर अभिनेते बाबूराव पेंढारकर, भालजी पेंढारकर, व्ही. शांताराम हे काका होते. निर्माता-दिग्दर्शक मा. विनायक यांचा शेवटचा चित्रपट *मंदिर* या चित्रपटात ती बालकलाकार म्हणून पहिल्यांदा पडद्यावर आली. त्यानंतर *पंढरीचा पाटील, जग्गू, अंगारे* या चित्रपटात तिने बाल भूमिका केल्या. १९५५चा *कुलदैवत* तिने नायिकेची भूमिका केलेला पहिला मराठी चित्रपट, नायक राजन. १९५६ चा *तुफान और दिया* तिने नायिकेची भूमिका केलेला पहिला हिंदी चित्रपट, नायक राजेंद्रकुमार. *कुलदैवत, शेवग्याच्या शेंगा, देवघर, देव जागा आहे, झालं गेलं विसरून जा* हे तिने भूमिका केलेले मराठी चित्रपट.

सुनंदा पाटोळे, कुडाळ.

□ **भारतीय चित्रपटातील पहिला खलनायक कोण? चित्रपट कोणता?**

– १९१३चा दादासाहेब फाळके यांचा *राजा हरिश्चंद्र* पहिला भारतीय चित्रपट. या चित्रपटात विश्वामित्राची भूमिका करणारे गजानन वासुदेव साने भारतीय चित्रपटातील पहिले खलनायक.

□ **बैजू *बावरा* या चित्रपटाचे दिग्दर्शक कोण? प्रमुख कलाकार कोण? गीतकार आणि संगीतकार कोण?**

– *बैजू बावरा*चे दिग्दर्शक विजय भट्ट. कलाकार भारतभूषण, मीनाकुमारी, कुलदीप कौर, राधाकिशन, बिपिन गुप्ता, रतनकुमार, बेबी तब्बसुम, कृष्णाकुमारी, मनमोहन कृष्ण, बी. एम. व्यास, केसरी सुरेंद्र, रामानंद, गीतकार शकील बदायुनी, संगीतकार नौशाद.

रविकांत रोहिदास साखरे, कुंभारतळे

□ **नाना पाटेकरने केलेले मराठी चित्रपट? कोणत्या साली प्रदर्शित झाले? दिग्दर्शक कोण?**



सूर्योदयमध्ये नाना-दिप्ती

– *सिंहासन* (१९७९) दिग्दर्शक जब्बार पटेल, *भालू* (१९८०) दिग्दर्शक राजदत्त, *नागीण* (१९८१) दिग्दर्शक रमाकांत कवठेकर, *आव्हान* (१९८२) दिग्दर्शक सुशीला कामत, *राघूमैना* (१९८३) दिग्दर्शक राजदत्त, *सावित्री* (१९८३) दिग्दर्शक मुरलीधर कापडी, *गड जेजुरी जेजुरी* (१९८५) दिग्दर्शक राम कदम, *माफीचा साक्षीदार* (१९८६) दिग्दर्शक राजदत्त, *सूर्योदय* (१९८९) दिग्दर्शक गगनबिहारी बोराटे.

विजय पुणतांबेकर, कांदिवली (पूर्व).

□ **तानसेनमधील सायगलची नायिका खुरशिद हिने कोणकोणत्या हिंदी चित्रपटात भूमिका केल्या? या चित्रपटातील तिचे नायक कोण? तिचा शेवटचा चित्रपट कोणता?**

– *मधुर मिलन* (जयराज), *प्रेम समाधी* (बालाभाई), *शोख दिलरूबा* (नझीर), *सिपाही सालार* (युसूफ एफंडी), *किमयागार* (निसार), *साकी* (जयराज), *देखा जायेगा* (सिराज), *डॉटर ऑफ इंडिया* (आशिक हुसेन), *मर्द* (जयराज), *मेरी आँखे* (ईश्वरलाल), *कौन किसी का* (नझीर), *सितारा* (नझीर), *धर्म बंधन* (युसूफ एफंडी), *होली* (ईश्वरलाल), *मुसाफिर* (ईश्वरलाल), *बेटी* (अरुण), *परदेसी* (मोतीलाल), *शादी* (ईश्वरलाल), *भक्त सुरदास, तानसेन* (सायगल), *चांदणी* (ईश्वरलाल), *नर्स* (अरुण), *मुमताज महल* (चंद्रमोहन), *शहेनशहा बाबर* (सुशीलकुमार), *मूर्ती* (मोतीलाल), *प्रभू का घर* (त्रिलोक कपूर), *महाराणा प्रताप* (ईश्वरलाल), *फूलवारी* (मोतीलाल), *आगे बढो* (देव आनंद) *मंजधार* (सुरेंद्र), *मिट्टी* (सादिक अली) या चित्रपटात तिने भूमिका केल्या. मंजधार हा भारतातील तिचा शेवटचा चित्रपट. त्यानंतर ती पाकिस्तानला गेली आणि तिथे काही चित्रपटात भूमिका केल्यावर ती पार्श्वगायिका बनली आणि काही पाकिस्तानी चित्रपटात तिने गाणी गायली. गेल्या वर्षी १८ एप्रिलला पाकिस्तानात तिचं निधन झालं.

□ **अमजद खानचे वडील कोण होते? ते चित्रपट व्यवसायाशी संबंधित होते का? त्यांचा पहिला चित्रपट कोणता? त्यांच्या पुढच्या पिढीतील किती सदस्य चित्रपटात आले?**

– अमजद खानचे वडील जयंत अभिनेते होते. त्यांचं खरं नाव झकीर खान. १९३३च्या *औरत का दिल* या चित्रपटात खलनायकाची छोटीशी भूमिका करून ते अभिनेते बनले. १९३७च्या *चॅलेंज* द्वारा ते नायक बनले जेव्हापासून ते १९४९च्या *शोहरत*पर्यंत ते नायक म्हणून चित्रपटात वावरत होते. त्या आधी १९४७च्या *डोलीपासून* त्यांनी चरित्र भूमिकांना सुरुवात केली आणि १९५०नंतर चरित्र अभिनेता, खलनायक म्हणून अनेक चित्रपटांत त्यांनी भूमिका केल्या. १९७५च्या ऑगस्टमध्ये त्यांचा मुलगा अमजद खान *शोलेद्वारा* प्रकाशात आला. पण त्याचं यश पाहायचं भाग्य त्यांना लाभलं नाही. *शोले* पडद्यावर यायच्या आधी दोन महिने ३ जून १९७५ला त्यांचं निधन झालं. जयंत यांच्यानंतर त्यांचे बंधू एन. के. झिरी दिग्दर्शक बनले. इम्तिहाज व अमजद हे पुत्र आणि नातू शादाब खान (अमजद खानचा पुत्र) अभिनेते बनले. तो *राजा की आयेगी बारात*मध्ये राणी मुखर्जीचा नायक होता. ●